CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

प्रहार | मुंबई | बुधवार, १ जानेवारी २०२५

# सहभाग, सहकार्य हाच नैनाच्या यशस्वितेचा मंत्र

◆ नवी मुंबई (वार्ताहर) :

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कार्यान्वयनाची वेळ जवळ येत असताना, त्याच्या आसपासचे नैना क्षेत्र, गुंतवणूकदार आणि भागधारकांसाठी आकर्षणाचे केंद्र बनले आहे. या क्षेत्राच्या नियोजन आणि विकासाची जबाबदारी असलेल्या सिडकोने, विकास प्रक्रियेत जमीनमालकांशी सहकार्य करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. तसेच नैना क्षेत्रातील अवैध बांधकामे आणि त्या संदर्भातील सिडकोच्या धोरणांची चर्चा केली आहे, परिणामी, सिडको आणि अन्य भागधारकांमध्ये अवैध बांधकामांच्या कारणांमुळे काही प्रमाणात संभ्रम निर्माण झाला आहे.

या समस्यांचा सामना करण्यासाठी आणि योजनाबद्ध विकास प्रक्रियेला गती देण्यासाठी,



सिडकोने आपल्या विविध विभागांना सक्रिय केले आहे, ज्यात नगर नियोजन, परिवहन नियोजन, बांधकाम परवाने, अभियांत्रिकी, भूमी व भूमापन आणि नियंत्रक अनधिकृत बांधकामे विभागांचा समावेश आहे. नाविन्यपूर्ण नगर रचना परियोजनेअंतर्गत लँड पूलिंग मॉडेलद्वारे मूळ जमिनीच्या ४० टक्के क्षेत्रफळाचे विकसित, अंतिम भूखंड जमीनमालकांना देण्यात येत आहेत, आणि शक्य तितक्या विद्यमान संरचना जतन करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत. हा एक संवेदनशील उपक्रम आहे जो लोकांचे विस्थापन टाळण्यासाठी करण्यात आला आहे. नैना प्रकल्प, नगर रचना परियोजनेच्या अनोख्या जमिनीच्या विकास मॉडेलवर आधारित आहे, जो गावकऱ्यांच्या आणि स्थानिकांच्या गरजांची संवेदनशीलतेने पूर्तता करतो. बहुतेक अंतिम भूखंड त्यांच्या मूळ ठिकाणी देण्यात आले आहेत त्यामुळे विस्थापन होत नाही.

नैना क्षेत्रात १४ गावांचा समावेश असून त्यातील १२ गावे पनवेल तालुक्यातील आणि २ उरण तालुक्यातील आहेत. या क्षेत्राकरीता सुसंयोजित विकास योजना सिडकोने तयार केली असून १० जानेवारी २०१३ पासून शासनाने अधिसूचित केलेल्या या क्षेत्रात कोणत्याही बांधकामासाठी नैना बांधकाम परवाना विभागाकडून पूर्व परवानगी घेणे अनिवार्य केले आहे. याद्वारे योजनाबद्ध विकास शक्य आहे, आणि नगर रचना परियोजनांच्या अंमलबजावणीला टप्प्याटप्प्याने विकसित करणे शक्य होत आहे.

नैना क्षेत्रातील एकात्मिक पायाभूत सुविधा विकास लवकरच सुरू होणार आहे, मात्र जमीनमालकांच्या सहकार्यानेच निर्धारित क्षेत्रात प्रवेश शक्य आहे. सिडकोने सर्व भागधारकांना याबाबत आवाहन केले आहे की, योजनाबद्ध आणि व्यवस्थित विकासाच्या दीर्घकालीन फायद्यांचा विचार करता सर्वांनी एकत्र येऊन यासाठी सहकार्य करावे.

सिडकोच्या सक्रिय धोरणांद्वारे आणि स्थानिक समुदायांसोबतच्या सहकार्यातून, नैना क्षेत्रासाठी एक रूपांतरकारी भविष्य घडवण्याची दृष्टी आहे. सहयोगी वातावरण तयार करणे आणि एकात्मिक विकास धोरणांचे पालन करणे याच्या माध्यमातून नैना प्रकल्पाला एक शाश्वत आणि सर्वसमावेशक शहरी विकासाचे मॉडेल बनवण्याचे उद्दिष्ट आहे.




बुधवार,
१ जानेवारी २०२५ लोकसत्ता

# नैना प्रकल्प यशस्वी करण्यासाठी सहकार्य करा

## सिडकोचे शेतकऱ्यांना आवाहन

लोकसत्ता प्रतिनिधी

**नवी मुंबई :** ११ वर्षांपूर्वी जाहीर केलेल्या नवी मुंबई विमानतळ अधिसूचित क्षेत्र म्हणजे नैना प्रकल्प पूर्णत्वाकडे नेण्यासाठी सिडको महामंडळाच्या हालचालींना वेग आला आहे. हा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी नैना प्रकल्पातील शेतकऱ्यांच्या सहकार्य आणि सहभागाची गरज असल्याचे मत सिडकोने मंगळवारी प्रसिद्धी पत्रक काढून जाहीर केले. यामुळे शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन नव्या वर्षात नैना प्रकल्पाची वीट रचली जाईल अशी चिन्हे निर्माण झाली आहेत.

दोन दिवसांपूर्वीच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीवर पहिल्या व्यावसायिक विमानाची यशस्वी चाचणी घेतल्यानंतर सिडको मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी १७ एप्रिलला विमानतळ सुरू करण्याचा संकल्प व्यक्त केला. याचवेळी विमानतळाशी संलग्न असणाऱ्या नैना प्रकल्पाची कामे लवकरच सुरू केली जातील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

नैना क्षेत्रात पनवेल तालुक्यातील ९२ तर उरणमधील दोन अशा ९४ गावांचा समावेश आहे. १० जानेवारी २०१३ पासून शासनाने अधिसूचित केलेल्या या क्षेत्रात कोणत्याही बांधकामासाठी नैना बांधकाम परवाना विभागाकडून पूर्व परवानगी घेणे बंधणकारक केले आहे. ही परवानगी मिळविण्यासाठी खर्चिक प्रक्रिया असल्याने शेतकरी वैतागले आहेत.

### विद्यमान नैना प्रकल्पाची स्थिती

नगर रचना आणि २ ला शासनाची अंतिम मान्यता प्राप्त झाली आहे. नगर रचना परियोजना ३ ते ७ ला प्राथमिक मंजुरी मिळालेली आहे, तर नगर रचना परियोजना ८ ते १२ साठी मसुदा योजनांकरीता लवादांची प्रक्रिया सुरू आहे. नगर रचना परियोजना १ आणि २ साठी प्रॉपर्टी कार्ड वितरणासाठी तयार आहेत आणि अंतिम भूखंडांचे हस्तांतरणही सोबतच शक्य आहे.

या परिसरातील अवैध बांधकामांमुळे काही प्रमाणात संभ्रम निर्माण झाल्याने मंगळवारी सिडकोने काढलेल्या प्रसिद्धीपत्रकात संबंधित संभ्रम दूर करण्यासाठी नगर नियोजन, परिवहन नियोजन, बांधकाम परवाने, अभियांत्रिकी, भूमी व भूमापन आणि नियंत्रक अनधिकृत बांधकामे या विभागांतील अधिकाऱ्यांना सक्रिय केल्याचा दावा सिडकोने केला. नैना प्रकल्पाच्या धोरणानुसार नगर रचना परियोजनेअंतर्गत लँड पूलिंग मॉडेलद्वारे मूळ जमिनीच्या ४० टक्के क्षेत्रफळाचे विकसित, अंतिम भूखंड जमीनमालकांना मिळणार आहे. शेतकऱ्यांचे विस्थापन टाळण्यासाठी हे मॉडेल सिडकोने आणले आहे. बहुतेक शेतकऱ्यांचे अंतिम भूखंड त्यांच्या मूळ ठिकाणी देण्यात आल्याचा दावा सिडकोने केला आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

मुंबई, बुधवार, १ जानेवारी २०२५

मुंबई तरुण भारत
www.mahamtb.com

# ‘नैना’ आधुनिक शहरी विकासाचे मॉडेल बनेल

## ‘सिडको’च्या माध्यमातून नैना क्षेत्राच्या विकासाला गती

**नवी मुंबई, दि. ३१ : प्रतिनिधी**

आगामी वर्षात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू होण्याचे संकेत मिळत आहेत. यामुळे विमानतळाच्या आसपासचे नैना क्षेत्र, गुंतवणूकदार आणि भागधारकांसाठी आकर्षणाचे केंद्र बनले आहे. या क्षेत्राच्या नियोजन आणि विकासाची जबाबदारी असलेल्या ‘सिडको’ने विकास प्रक्रियेत जमीनमालकांशी सहकार्य करण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

नैना क्षेत्राच्या योजनाबद्ध विकास प्रक्रियेला गती देण्यासाठी ‘सिडको’ने आपल्या विविध विभागांना सक्रिय केले आहे. ज्यामध्ये नगर नियोजन, परिवहन नियोजन, बांधकाम परवाने, अभियांत्रिकी, भूमी व भूमापन आणि नियंत्रक अनधिकृत बांधकाम विभागांचा समावेश आहे.

नाविन्यपूर्ण नगर रचना परियोजनेअंतर्गत ‘लॅण्ड पूलिंग मॉडेल’द्वारे मूळ जमिनीच्या ४० टक्के क्षेत्रफळाचे विकसित, अंतिम भूखंड जमीन मालकांना



देण्यात येत आहेत. शक्य तितक्या विद्यमान संरचना जतन करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. बहुतेक अंतिम भूखंड त्यांच्या मूळ ठिकाणी देण्यात आले आहेत. त्यामुळे विस्थापन होत नाही.

नैना क्षेत्रात ९४ गावांचा समावेश आहे. त्यातील ९२ गावे पनवेल तालुक्यातील आणि दोन उरण तालुक्यातील आहेत. या क्षेत्राकरिता सुसंयोजित ‘विकास योजना’ ‘सिडको’ने तयार केली आहे. दि. १० जानेवारी २०१३ सालापासून शासनाने अधिसूचित केलेल्या या क्षेत्रात कोणत्याही बांधकामासाठी नैना बांधकाम परवाना विभागाकडून पूर्व परवानगी घेणे अनिवार्य केले आहे. याद्वारे योजनाबद्ध विकास शक्य आहे.

नगर रचना परियोजनांच्या अंमलबजावणीला टप्प्याटप्प्याने विकसित करणे शक्य होत आहे. नगर रचना परियोजना १ आणि २ ला शासनाची अंतिम मान्यता प्राप्त झाली आहे. नगर रचना परियोजना तीन ते सातला प्राथमिक मंजुरी मिळालेली आहे, तर नगर रचना परियोजना ८ ते १२ साठी मसुदा योजनांकरिता लवादांची प्रक्रिया सुरू आहे. या टप्प्याटप्प्यांच्या मंजुरीमुळे नैनाच्या योजनाबद्ध विकास दृष्टिकोनाची पुष्टी झाली आहे. ‘नगर रचना परियोजना एक आणि दोन’साठी प्रॉपर्टी कार्ड वितरणासाठी तयार आहेत आणि अंतिम भूखंडांचे हस्तांतरणही सोबतच शक्य आहे. जमीन मालकांच्या सहकार्यानेच प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीला चालना मिळू शकेल.

काही बांधकामे नियोजित आरक्षित क्षेत्रात येत आहेत. ज्यामुळे स्थानिक रहिवाशांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. ‘सिडको’ने ‘नगर रचना परियोजना २’च्या प्रस्तावित रस्त्याच्या भागातील १६ बांधकाम धारकांना चौकशी पत्रे जारी केली आहेत. ज्यात बांधकामासंदर्भातील आवश्यक कायदेशीर परवानगी सादर करण्याची विनंती केली आहे.

नैना क्षेत्रातील एकात्मिक पायाभूत सुविधा विकास लवकरच सुरू होणार आहे. मात्र, जमीन मालकांच्या सहकार्यानेच निर्धारित क्षेत्रात प्रवेश शक्य आहे. ‘सिडको’ने सर्व भागधारकांना याबाबत आवाहन केले आहे की, योजनाबद्ध आणि व्यवस्थित विकासाच्या दीर्घकालीन फायद्यांचा विचार करता सर्वांनी एकत्र येऊन यासाठी सहकार्य करावे.




Newsband Wednesday, 1 January 2025

# NAINA development gains momentum with landowners' support

## *CIDCO urges co-operation*

By Chandrashekhar Hendve
@seashekhar

**Navi Mumbai:** As the commencement of flights from the Navi Mumbai International Airport approaches, the development of the NAINA (New Navi Mumbai Airport Influence Notified Area) region has become a focal point for investors and stakeholders. CIDCO, the City and Industrial Development Corporation, has been proactive in raising awareness and ensuring the successful development of this area with active participation from landowners.

However, recent reports have highlighted concerns regarding illegal construction within the NAINA region, with fears of demolition affecting around 5,000 unauthorized structures. This has led to some apprehension among landowners and stakeholders about the potential threat to these unapproved constructions.

To address these challenges and ensure a seamless development process, CIDCO has mobilized a range of departments, including Town Planning, Transportation Planning, Building Permissions, Engineering, Lands and Survey, and CCUC, to focus on the NAINA project through the innovative Town Planning Scheme (TPS). This land pooling model offers landowners 40% of the developed original land as final plots, with a strong emphasis on retaining existing structures as much as possible. The initiative is designed to be people-friendly and sensitive, minimizing displacement while encouraging collaboration.

The NAINA region, which spans 94 villages (92 in Panvel Taluka and 2 in Uran Taluka), is being developed under a comprehensive plan. Since January 10, 2013, the Government has mandated that all construction within this notified area require prior approval from CIDCO's NAINA Building Permission Department. This ensures that developments align with the overall development plan and are implemented in phases under the TPS model.

Progress on the TPS initiative reflects CIDCO's commitment to structured and sustainable growth with community involvement. TPS 1 and 2 have already secured final government approval, while TPS 3 to 7 have received preliminary approval. Draft plans for TPS 8 to 12 are currently undergoing arbitration. Property cards for TPS 1 and 2 are ready for distribution, allowing for the transfer of final plots to landowners. However, the full success of the project depends on the continued cooperation of landowners.

Despite the advances, some construction projects fall within planned reservation areas, raising concerns among residents. CIDCO has issued letters to 16 construction holders in the proposed road area of TPS 2, requesting verification of permissions. This transparent approach reflects CIDCO's commitment to managing development in the region within the legal framework.

With integrated infrastructure development set to begin soon, CIDCO emphasizes the need for landowners' cooperation in granting access to designated areas. CIDCO's appeal to stakeholders underscores the long-term benefits of planned development, presenting the NAINA project as a golden opportunity for both landowners and investors.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

लोकमत
मुंबई, बुधवार, दि. १ जानेवारी २०२५




# सिडकोत कर्डिले यांनी स्वीकारला कार्यभार

लोकमत न्यूज नेटवर्क

नवी मुंबई : सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप ढोले यांची बदली झाल्याने त्यांच्या रिक्त पदावर शासनाने वर्धा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची नियुक्ती केली होती. त्यानुसार कर्डिले यांनी सोमवारी सिडको भवनमध्ये दिलीप ढोले यांच्याकडून सहव्यवस्थापकीय संचालकपदाचा कार्यभार स्वीकारला.

सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी त्यांचे स्वागत करून त्यांना नवीन पदाची जबाबदारी दिली. कर्डिले यांनी यापूर्वी विविध विभागांत महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. एमएमआरडीएचे सहआयुक्त म्हणूनही त्यांनी जबाबदारी पार पडली आहे. वर्ध्याचे जिल्हाधिकारी म्हणून बजावलेली भूमिका त्यांची आतापर्यंतची सर्वोत्कृष्ट कामगिरी ठरली आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

नव शक्ति
मुंबई, बुधवार, १ जानेवारी २०२५ marathi.freepressjournal.in

# सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालकपदी राहुल कर्डिले




**नवी मुंबई** : सिडकोत नियुक्त झालेले सनदी अधिकारी राहुल कर्डिले यांनी मंगळवारी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांची भेट घेऊन बेलापूर येथील सिडको भवन येथे पदभार स्वीकारला. सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालकपदाचा कार्यभार स्वीकारण्यापूर्वी ते जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी, वर्धा म्हणून कार्यरत होते. सेवादूत उपक्रमांतर्गत ग्रामस्तरीय उद्योजका मार्फत ऑनलाइन प्रक्रिया राबवून नागरिकांना घरपोच सेवा देण्याचा पथदर्शी प्रकल्पही त्यांनी राबविला होता. नागरिकांकरिता ९० हून अधिक सेवा अधिसूचित करणे, ९० सेवांपैकी २७ सेवा या ऑनलाइन आरटीएस पोर्टलच्या माध्यमातून त्यांनी उपलब्ध करून दिल्या होत्या.

CIDCO
WE MAKE CITIES
NEWS

नवराष्ट्र
www.navarashtra.com

# सिडको सहव्यवस्थापकीय संचालक पदावर राहुल कर्डिले




नवी मुंबई, (वा.)राहुल कर्डिले, भाप्रसे यांनी सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार पूर्वीचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप ढोले यांच्याकडून ३१ डिसेंबर २०२४ रोजी सिडको भवन येथे स्वीकारला. राहुल कर्डिले हे २०१५ च्या तुकडीतील महाराष्ट्र कॅडरचे भारतीय प्रशाकीय सेवा (आयएएस) अधिकारी आहेत. राहुल कर्डिले हे अभियांत्रिकी (इन्स्ट्रूमेन्टेशन) पदवीधर आहेत. यापूर्वी त्यांनी अधिसंख्य सहाय्यक जिल्हाधिकारी, अमरावती, सहाय्यक जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी, सेलू, जि. परभणी, मुख्य कार्यकारी अधिकारी, चंद्रपूर जिल्हा परिषद आणि सहआयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए), मुंबई ही पदे भूषवली आहेत. सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार स्वीकारण्यापूर्वी राहुल कर्डिले हे जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी, वर्धा म्हणून कार्यरत होते. वर्धा येथे जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असताना राहुल कर्डिले यांनी तालुका स्तरापर्यंत ई-कार्यालय या उपक्रमाची अंमलबजावणी केली होती. ई-कार्यालय उपक्रमाची तालुका स्तरापर्यंत अंमलबजावणी करणारा वर्धा हा महाराष्ट्रातील पहिला जिल्हा ठरला होता. सेवादूत उपक्रमांतर्गत ग्रामस्तरीय उद्योजका (व्हीएलई) मार्फत ऑनलाइन प्रक्रिया राबवून नागरिकांना घरपोच सेवा देण्याचा पथदर्शी प्रकल्पही त्यांनी राबविला होता.

Thane Navi Mumbai Plus Edition
Jan 01, 2025 Page No. 4
Powered by: Navarashtra.com

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

प्रहार | मुंबई | बुधवार, १ जानेवारी २०२५

# राहुल कर्डिले यांनी स्वीकारला सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालकपदाचा कार्यभार

◆ नवी मुंबई (वार्ताहर) :

राहुल कर्डिले, भाप्रसे यांनी सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. राहुल कर्डिले हे सन २०१५ च्या तुकडीतील महाराष्ट्र कॅडरचे भारतीय प्रशाकीय सेवा (आयएएस) अधिकारी आहेत. तसेच यापूर्वी त्यांनी अधिसंख्य सहाय्यक जिल्हाधिकारी, अमरावती, सहाय्यक जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी, सेलू, जि. परभणी, मुख्य कार्यकारी अधिकारी, चंद्रपूर जिल्हा परिषद आणि सहआयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए), मुंबई ही पदे भूषवली आहेत. सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार स्वीकारण्यापूर्वी राहुल कर्डिले हे जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी, वर्धा म्हणून कार्यरत होते. वर्धा येथे जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असताना कर्डिले यांनी तालुका स्तरापर्यंत ई-कार्यालय या उपक्रमाची अंमलबजावणी केली होती. ई-कार्यालय उपक्रमाची तालुका स्तरापर्यंत अंमलबजावणी करणारा वर्धा हा महाराष्ट्रातील पहिला जिल्हा ठरला होता. सेवादूत उपक्रमांतर्गत ग्रामस्तरीय उद्योजका (व्हीएलई) मार्फत ऑनलाइन प्रक्रिया राबवून नागरिकांना घरपोच सेवा देण्याचा पथदर्शी प्रकल्पही त्यांनी राबविला होता. नागरिकांकरिता ९० अधिकच्या सेवा अधिसूचित करणे, ९० सेवांपैकी २७ सेवा या ऑनलाइन आरटीएस पोर्टलच्या माध्यमातून त्यांनी उपलब्ध करून दिल्या होत्या. तसेच वर्धा जिल्ह्यातील ९६ दुष्काळी गावांतील ९० कि.मी. च्या नाल्याचे खोलीकरण व नाल्याच्या काठाने बांबूची लागवड, वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेला पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न आदी उपक्रम त्यांनी वर्धा येथे राबविले होते.



CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

जागरूक टाइम्स | मुंबई | बुधवार, 1 जनवरी 2025

# सिडको के सहप्रबंध निदेशक राहुल कर्डिले ने ग्रहण किया कार्यभार

जागरूक टाइम्स संवाददाता



**नवी मुंबई।** राहुल कर्डिले, भाप्रसे ने 31 दिसंबर को सिडको भवन में सिडको के सहप्रबंध निदेशक पद का कार्यभार पूर्व सहप्रबंध निदेशक दिलीप ढोले से ग्रहण किया। राहुल कर्डिले 2015 बैच के महाराष्ट्र कैडर के भारतीय प्रशासनिक सेवा (आईएएस) अधिकारी हैं। वे इंजीनियरिंग (इंस्ट्रूमेंटेशन) में स्नातक हैं। इससे पहले उन्होंने अधिसंख्य सहायक जिलाधिकारी, अमरावती, सहायक जिलाधिकारी और उपविभागीय अधिकारी, सेलू, जि. परभणी, मुख्य कार्यकारी अधिकारी, चंद्रपूर जिला परिषद और सहआयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए), मुंबई के पद पर अपनी सेवाएं प्रदान की हैं। सिडको के सहप्रबंध निदेशक पद का कार्यभार स्वीकार करने से पहले राहुल कर्डिले जिलाधिकारी और जिला दंडाधिकारी, वर्धा के तौर पर कार्यरत थे। वर्धा में जिलाधिकारी के तौर पर कार्यरत होने के दौरान राहुल कर्डिले ने तालुका स्तर तक ई-कार्यालय योजना लागू की थी। वर्धा महाराष्ट्र का पहला जिला था, जहां इस योजना को तालुका स्तर पर लागू किया गया। "सेवादूत" योजना के तहत ग्रामस्तरीय उद्यमियों (व्हीएलई) के माध्यम से ऑनलाइन प्रक्रियाओं को लागू कर नागरिकों को घर-घर सेवाएं प्रदान करने की पहल भी उन्होंने की थी। इसके अलावा, उन्होंने वर्धा जिले में 90 से अधिक सेवाओं को अधिसूचित किया और इनमें से 27 सेवाएं ऑनलाइन आरटीएस पोर्टल के माध्यम से उपलब्ध कराईं। कर्डिले ने वर्धा जिले के 96 सूखा प्रभावित गांवों में 90 किलोमीटर के नालों का गहरीकरण किया और नालों के किनारे बांस की खेती की शुरुआत की। उन्होंने वर्धा जिला केंद्रीय सहकारी बैंक को पुनर्जीवित करने का प्रयास भी किया।

- 2015 बैच के महाराष्ट्र कैडर के आईएएस अधिकारी
- वर्धा में डीएम के तौर पर लागू की थी ई-कार्यालय योजना

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in




आपलं महानगर | My महानगर.com

Mumbai Edition

Jan 01, 2025 Page No. 1

# राहुल कर्डिले यांनी पदभार स्वीकारला

▶ **नवी मुंबई :** सनदी अधिकारी राहुल कर्डिले यांनी मंगळवारी सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार पूर्वीचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप ढोले यांच्याकडून सिडको भवन येथे स्वीकारला. सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार स्वीकारण्यापूर्वी राहुल कर्डिले हे जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी, वर्धा म्हणून कार्यरत होते. नाशिक महापालिकेचे आधीचे आयुक्त डॉ. अशोक करंजकर यांच्या जागी राहुल कार्डिलेंची बदली करण्यात आली होती. परंतु भाजपच्या एका बड्या नेत्याच्या नाराजीमुळे कर्डिलेंची नियुक्ती अवघ्या ३ दिवसांत रद्द करण्यात आली होती. त्यांच्या जागी नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आयुक्त मनीषा खत्री यांची महापालिका आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली. तर राहुल कर्डिले यांच्याकडे सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार सोपवण्यात आला होता.

पान २

# राहुल कर्डिले यांनी पदभार स्वीकारला

राहुल कर्डिले हे सन २०१५ च्या तुकडीतील महाराष्ट्र कॅडरचे भारतीय प्रशासकीय सेवा (आयएएस) अधिकारी आहेत. राहुल कर्डिले हे अभियांत्रिकी (इन्स्ट्रूमेन्टेशन) पदवीधर आहेत. यापूर्वी त्यांनी अधिसंख्य सहाय्यक जिल्हाधिकारी, अमरावती, सहाय्यक जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी, सेलू, जि. परभणी, मुख्य कार्यकारी अधिकारी, चंद्रपूर जिल्हा परिषद आणि सहआयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए), मुंबई ही पदे भूषवली आहेत.

वर्धा येथे जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असताना राहुल कर्डिले यांनी तालुका स्तरापर्यंत ई-कार्यालय या उपक्रमाची अंमलबजावणी केली होती. ई-कार्यालय उपक्रमाची तालुका स्तरापर्यंत अंमलबजावणी करणारा वर्धा हा महाराष्ट्रातील पहिला जिल्हा ठरला होता. सेवादूत उपक्रमांतर्गत ग्रामस्तरीय उद्योजका (व्हीएलई) मार्फत ऑनलाईन प्रक्रिया राबवून नागरिकांना घरपोच सेवा देण्याचा पथदर्शी प्रकल्पही त्यांनी राबविला होता. नागरिकांकरिता ९० अधिकच्या सेवा अधिसूचित करणे, ९० सेवांपैकी २७ सेवा या ऑनलाईन आरटीएस पोर्टलच्या माध्यमातून त्यांनी उपलब्ध करून दिल्या होत्या. तसेच वर्धा जिल्ह्यातील ९६ दुष्काळी गावांतील ९० कि.मी. च्या नाल्याचे खोलीकरण व नाल्याच्या काठाने बांबूची लागवड, वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न इ. उपक्रम त्यांनी वर्धा येथे राबविले होते.

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# नवी मुंबई विमानतळाचा पुणेकरांना सर्वाधिक फायदा

## ४ ते ५ तासांचा प्रवास आता निम्म्यावर, २ तासांत विमानतळ गाठणे शक्य

प्रतिनिधी। आपलं महानगर वृत्तसेवा

**नवी मुंबई:** नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळावरून येत्या चार महिन्यात म्हणजेच साधारणतः एप्रिल महिन्यात विमानसेवा सुरळीतपणे सुरू होणार आहे. त्यामुळे १७ एप्रिल २०२५पासून या विमानतळावरून प्रवासी व मालवाहतुकीसाठीची उड्डाणे सुरू करण्याचा निर्धार व्यवस्थापनाने व्यक्त केला आहे. रविवारी २९ डिसेंबर २०२४ रोजी या विमानतळावर पहिल्या व्यावसायिक विमानाचे यशस्वीरित्या लँडिंग करण्यात आले. इंडिगो A३२० प्रवासी विमान ०१ वाजून ३८ मिनिटांनी लँड झाले आणि विमानतळावर एकच जल्लोष झाला. त्यामुळे आता नवी मुंबईतील हे विमानतळ चालू होण्याची उत्सुकता सर्वांनाच लागून राहिलेली आहे, परंतु या विमानतळाचा सर्वाधिक फायदा हा पुणेकरांना होणार आहे. कारण या विमानतळामुळे पुणेकरांच्या वेळेत मोठी बचत होणार आहे.

पुणेकर सध्या विमान प्रवास करण्यासाठी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा वापर करतात. परंतु, पुण्यावरून मुंबईला येण्याकरिता साधारणतः ४ ते ५ तासांचा वेळ लागतो. मात्र, पुणे ते नवी मुंबई हा प्रवास केवळ ०२ तास २० मिनिटांमध्ये पार करता येते. त्यातही एक्सप्रेस वेवरून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ गाठणे तर आणखीच सोपे आहे. या विमानतळामुळे पुणेकरांचा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रवास अधिक सुलभ आणि सुखकर होणार आहे. याचमुळे पुणेकरांच्या वेळेची बचत तर होणारच आहे, पण त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे या आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे पुणेकरांना प्रवासही कमी करावा लागणार आहे. असे नाही की पुण्यात विमानतळ नाही. पुणेकरांसाठी लोहगाव विमानतळ आहे, जे सर्वात



जवळ आहे. पण या ठिकाणाहून मर्यादित विमानसेवा असल्याने याचा फारसा पुणेकरांना फायदा होत नाही.

लोहगाव विमानतळावरून फक्त दुबई, सिंगापूर आणि बँकॉक या तीन ठिकाणीच आंतरराष्ट्रीय विमाने उड्डाण घेतात. यासंदर्भात हवाई वाहतूक तज्ज्ञ धैर्यशील वंदेकर यांनी एका वृत्तसंस्थेला माहिती देत म्हटले की, पुण्यातल्या लोहगाव विमानतळावर आंतरराष्ट्रीय उड्डाणांसाठी मर्यादा आहेत. तिथल्या धावपट्ट्या कमी आहेत. त्यामुळे युरोप आणि अमेरिकेत तिथून विमान उड्डाणे होत नाहीत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय विमानांसाठी प्रवाशांना हैदराबाद, बंगळुरू किंवा दिल्लीला जावे लागते. बाणेरमध्ये राहणाऱ्या व्यक्तीला तर जेवढा वेळ लोहगाव विमानतळावर जायला लागेल, तेवढाच किंवा त्यापेक्षा किंचित जास्त वेळात ती व्यक्ति थेट नवी मुंबई विमानतळापर्यंत पोहोचेल.

तर, पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर कार्गो विमानांसाठी पुरेशी सुविधा उपलब्ध नसल्यामुळे उद्योग-व्यावसायिकांसाठीही वेगळे पर्याय शोधणे आवश्यक ठरते. पण नवी मुंबई विमानतळामुळे ही अडचण दूर होऊ शकते. नाशिवंत मालाची आयात-निर्यात करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी नवी मुंबई विमानतळ हा चांगला पर्याय ठरू शकतो. पुण्याजवळच्या चाकण व तळेगावमधील उद्योगांसाठी नवी मुंबई विमानतळापर्यंत पोहोचण्याचा कमी वेळ महत्त्वाचा ठरू शकतो.

Mumbai Edition
Jan 01, 2025 Page No. 6
Powered by: erelego.com

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

**कृषीवल** बुधवार दि. १ जानेवारी, २०२५

# सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालकपदी राहुल कर्डिले




। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालकपदाचा कार्यभार राहुल कर्डिलेयांनीपूर्वीचेसहव्यवस्थापकीय संचालक दिलीप ढोले यांच्याकडून ३१ डिसेंबर रोजी सिडको भवन येथे स्वीकारला.

राहुल कर्डिले हे सन २०१५ च्या तुकडीतील महाराष्ट्र कॅडरचे भारतीय प्रशाकीय सेवा (आयएएस) अधिकारी आहेत. राहुल कर्डिले हे अभियांत्रिकी (इन्स्ट्रूमेन्टेशन) पदवीधर आहेत. यापूर्वी त्यांनी अधिसंख्य सहाय्यक जिल्हाधिकारी, अमरावती, सहाय्यक जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी, सेलू, जि. परभणी, मुख्य कार्यकारी अधिकारी, चंद्रपूर जिल्हा परिषद आणि सहआयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए), मुंबई ही पदे भूषवली आहेत. सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार स्वीकारण्यापूर्वी राहुल कर्डिले हे जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी, वर्धा म्हणून कार्यरत होते.

वर्धा येथे जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असताना राहुल कर्डिले यांनी तालुका स्तरापर्यंत ई-कार्यालय या उपक्रमाची अंमलबजावणी केली होती. ई-कार्यालय उपक्रमाची तालुका स्तरापर्यंत अंमलबजावणी करणारा वर्धा हा महाराष्ट्रातील पहिला जिल्हा ठरला होता. सेवादूत उपक्रमांतर्गत ग्रामस्तरीय उद्योजका (व्हीएलई) मार्फत ऑनलाइन प्रक्रिया राबवून नागरिकांना घरपोच सेवा देण्याचा पथदर्शी प्रकल्पही त्यांनी राबविला होता. नागरिकांकरिता ९० अधिकच्या सेवा अधिसूचित करणे, ९० सेवांपैकी २७ सेवा या ऑनलाइन आरटीएस पोर्टलच्या माध्यमातून त्यांनी उपलब्ध करून दिल्या होत्या. तसेच वर्धा जिल्ह्यातील ९६ दुष्काळी गावांतील ९० कि.मी. च्या नाल्याचे खोलीकरण व नाल्याच्या काठाने बांबूची लागवड, वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न इ. उपक्रम त्यांनी वर्धा येथे राबविले होते.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

**सकाळ** मुंबई, बुधवार, १ जानेवारी २०२५

# पनवेलच्या गतिमान विकासाची नवी पहाट

## नवी मुंबई विमानतळ टेकऑफ करणार; पनवेल-कर्जत लोकल सेवाही दृष्टिक्षेपात

वसंत जाधव : सकाळ वृत्तसेवा

पनवेल, ता. ३१ : सरत्या वर्षाला निरोप देताना पनवेलकरांनी नवीन वर्षाचे जल्लोषात स्वागत केले. २०२४ या वर्षात अनेक प्रश्न मार्गी लागले; तर काही तसेच राहिले. नवीन वर्षात अनेक प्रकल्प कार्यान्वित होतील. विशेषकरून एप्रिल महिन्यामध्ये नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रवासी सेवेसाठी टेकऑफ करणार आहे. त्यामुळे पनवेलला एक वेगळे महत्त्व प्राप्त होणार आहेत. त्याचबरोबर पनवेल-कर्जत रेल्वे मार्ग दृष्टिक्षेपात आला आहे. पनवेल महापालिका क्षेत्रातील वेगवेगळी उद्याने आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट अकॅडमीचे लोकार्पणसुद्धा केले जाणार आहे. त्यामुळे हे वर्ष गतिमान विकासाची नवी पहाट असणार आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पार्श्वभूमीवर पनवेलला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. दोन दिवसांपूर्वी इंडिगो कंपनीच्या विमानाने या ठिकाणी टेकऑफ केले. सर्व चाचण्या यशस्वीरित्या पार पडल्या आहेत. मार्च २०२५पर्यंत विमानतळाकरिता आवश्यक असणाऱ्या सर्व परवानग्या प्राप्त होणार आहेत. १७ एप्रिलला देशांतर्गत विमानसेवा सुरू होणार आहे; तर जून महिन्यामध्ये आंतरराष्ट्रीय एअरलाइन्स प्रवास नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून करता येणार आहे. या पार्श्वभूमीवर कनेक्टिव्हिटीच्या दृष्टिकोनातून उड्डाणपूल, जंक्शन विस्तारीकरण, नवीन मेट्रो लाइन टाकण्यात येणार आहे. नवीन वर्षामध्ये या कामांनासुद्धा वेग येणार आहे. नवीन पनवेलमध्ये उभारण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिकेट अकॅडमीचेसुद्धा लोकार्पण येत्या काही दिवसांमध्ये होणार आहे. हे काम जवळपास पूर्णत्वास आले आहे. या क्रिकेट प्रशिक्षण केंद्रामधून स्थानिक खेळाडूंना क्रिकेटचे धडे दिले जाणार आहेत. आता याकरिता मुंबईत जाण्याची आवश्यकता भासणार नाही. पनवेल-कर्जत उपनगरीय रेल्वेसेवेची गेल्या अनेक वर्षांपासून प्रतीक्षा आहे. हा दुहेरी मार्ग टाकण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. सर्वांत मोठा बोगदा या रेल्वे मार्गावर असून, त्याचे कामसुद्धा सुरू झाले आहे. नवीन वर्षामध्ये ही रेल्वेसेवा सुरू होणे अपेक्षित आहे. त्यामुळे रेल्वे प्रवाशांचा वेळ वाचणार आहे. मुंबई अधिक जवळ येणार आहे. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाचे विस्तारीकरणाचे सर्वेक्षण पाच वर्षी होईल. त्याचबरोबर जेएनपीए हे चौक या महामार्गाचा मार्गसुद्धा मोकळा होईल.



### मुबलक पाणी मिळणार

१ पनवेल, नवीन पनवेल, कळंबोली भोकरपाडा येथून पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्या बदलण्याचे काम सुरू आहे. नवीन वर्षामध्ये नवीन जलवाहिन्यांमधून पाणीपुरवठा केला जाणार असल्याने पाण्याची गळती थांबणार आहे. होणारा अपव्यय टळणार आहे. त्याचबरोबर महापालिकेला अतिरिक्त कोटा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे पनवेलच्या पाणीटंचाईचा प्रश्न सुटणार आहे.

### मिसिंग लिंक सुरू होणार

२ मुंबई-पुणे अंतर कमी करण्याच्या हेतूने, तसेच बोर घाटात वाहतूक कोंडी होऊ नये या उद्देशाने रस्ते विकास महामंडळाने मिसिंग लिंक तयार केली आहे. पूल आणि बोगद्याच्या माध्यमातून २० मिनिटे अंतर कमी होणार आहे. हे काम अंतिम टप्प्यात असून, याच वर्षात हा मार्ग सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे येथील दळणवळण अधिक गतीने होणार आहे.



पनवेल : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम गतीने सुरू असून चालू वर्षात येथील विमानसेवेला सुरुवात होणार आहे.

### नवी मुंबईवरील ताण कमी

तिसऱ्या मुंबईच्या अनुषंगाने होणाऱ्या महामार्गांमुळे मुंबई शहराला महामार्गाने जोडले जाणार आहे. त्यामुळे गोवा व पश्चिम महाराष्ट्रातील दळणवळण, तसेच वाहतूक चौकमार्गे थेट न्हावा-शेवा, ट्रान्सहार्बरमार्गे मुंबईत जाणार आहे. या मार्गामुळे मुंबई पोर्ट ट्रस्ट व जेएनपीए ही देशातील महत्त्वाची बंदरे जोडली जाणार असल्याने नवी मुंबई, ठाणे शहरावरील ताण कमी होणार आहे.

### प्रशासकीय भवनचे लोकार्पण!

पनवेल येथील सर्व सरकारी कार्यालये एकाच छताखाली आणण्यासाठी प्रशासकीय भवन उभारण्यात आले आहे. मात्र गेल्या १० वर्षांपासून तांत्रिक अडचणी आणि अडथळ्यांमध्ये हे काम रखडले होते. या अडचणी बऱ्याचअंशी दूर झालेल्या आहेत. त्यामुळे नवीन वर्षात प्रशासकीय भवनाचे लोकार्पण केले जाणार आहे. येथे तहसीलपासून इतर कार्यालये एकत्रित येणार आहेत.

पनवेल महापालिका अतुलनीय प्रगती करत आहे. एमएमआरडी झोनमधील इतर भागांच्या तुलनेत पनवेल महापालिका उत्तम सुविधा देत आहे. पनवेल शहर हे मुंबई, नवी मुंबई, तसेच तिसऱ्या मुंबईला जोडणारा दुवा ठरणार असून, भविष्यात पनवेलला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होणार आहे. येत्या काळात राहण्यायोग्य पहिल्या पाच शहरांमध्ये पनवेलचा समावेश होणार आहे.
- मंगेश चितळे, आयुक्त, पनवेल महापालिका

नवीन वर्षामध्ये नवी मुंबई विमानतळ व तळोजा या ठिकाणी होत असलेल्या नव्या औद्योगिक वसाहतीमुळे पनवेल परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. वाढत्या लोकसंख्येसाठी पनवेल परिसरात पायाभूत सुविधा व प्रशासकीय यंत्रणा गतिमान करून पनवेलकरांचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टिकोनातून पावले उचलली जाणार आहेत.
- प्रशांत ठाकूर, आमदार, पनवेल

@Cidco Ltd | @cidco_Ltd | @cidco_Ltd | @CIDCO Ltd. | cidco.maharashtra.gov.in

महाराष्ट्र टाइम्स । मुंबई । बुधवार, १ जानेवारी २०२५

# नव्या वर्षात अनेक प्रकल्पांचे 'उड्डाण'

## विमानतळ, सुविधा इमारती, रेल्वेमार्ग, बसडेपो, उड्डाणपूल, कॉरिडॉरची भेट

**नवी मुंबई, पनवेलकरांना नवीन वर्षात अनेक नवीन प्रकल्पांची भेट मिळणार आहे. शहरातील अनेक सुविधा इमारती बांधून तयार असून त्यातील अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांचे लोकार्पण करून नागरिकांसाठी त्या खुल्या केल्या जाणार आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, दिल्ली - मुंबई फ्रंट कॉरिडॉर, पनवेल रेल्वे जंक्शन, अटल सेतूला पुण्याशी जोडणारा कॉरिडॉर आदींसह वाशी डेपो इमारत, नेरूळमधील सायन्स पार्क, ऐरोली नाट्यगृहाची इमारत, सानपाडा दैनंदिन बाजार इमारतीचा यामध्ये समावेश आहे.**



टीम मटा

बहुप्रतीक्षित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प एप्रिल २०२५ अखेरीस कार्यान्वित होणार असल्याचे सांगितले जात आहे. नवी मुंबईकरांनी नुकताच याचा थोडक्यात अनुभव घेतला. २९ डिसेंबर रोजी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीवर पहिल्या व्यावसायिक विमानाचे यशस्वी लँडिंग झाले. देशातील पहिले ग्रीनफिल्ड विमानतळ असा या विमानतळाचा गौरव होणार आहे.

नवी मुंबई विमानतळाची चर्चा गेल्या १५ वर्षांपासून होत आहे. विमानतळाचे कारण देत विकासकांनी घरांचे भाव वाढवले. विमानतळ उभारणीत मोठी अडचण होती, ती या विमानतळामुळे बाधित होणाऱ्या दहा गावांतील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची. अखेर प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात सिडकोला यश आले. त्यानंतर विविध केंद्रीय खात्यांच्या परवानग्यांचा अडथळा पार करण्यात आल्यानंतर खऱ्या अर्थाने नवी मुंबई विमानतळाच्या उभारणीला सुरुवात झाली आहे.

### वाशी डेपो होणार कार्यान्वित

वाशीतील महापालिकेच्या डेपोचा वाणिज्यिक विकास करण्यात आला आहे. त्यानुसार खाली डेपो आणि त्यावर व्यावसायिक संकुले उभारण्यात आली आहे. सहा महिन्यांपूर्वीच ही इमारत बांधून तयार आहे. १२१ कोटींचा हा पालिकेचा मोठा प्रकल्प आहे. त्याचे लोकार्पण या नवीन वर्षाच्या सुरुवातीला होण्याची शक्यता आहे. शिवाय व्यावसायिक संकुलेही भाडे तत्त्वावर देण्यासाठी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यामुळे प्रवाशांना अत्याधुनिक डेपो मिळणार आहे.



### पळस्पेहून थेट पुण्यासाठी एक्स्प्रेस वे

पनवेल तालुक्यात वेगवेगळी विकासकामे सुरू आहेत. विमानतळामुळे वाहतुकीवर होणाऱ्या परिणामांचा विचार करून अटल सेतूहून थेट मुंबई-पुणे महामार्गावर जाता येणार आहे. अटल सेतूवरून मुंबई-पुण्याच्या दिशेने ये-जा करणाऱ्या वाहनांना थेट मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर जोडण्यासाठी पळस्पे फाटा ते कोन या टप्प्यात इलेव्हेटेड कॉरिडोर बांधण्यात येणार आहे. एमएमआरडीए १,४०० रुपये खर्च करून दोन ठिकाणी कॉरिडोर बांधेल. पनवेल, जेएनपीटी, एमएमआरडीए आणि सिडको क्षेत्राला २४८ एमएलडी पाणी देणाऱ्या न्हावाशेवा पाणीपुरवठा योजनेचे काम वेगाने सुरू आहे.

### दैनंदिन बाजार इमारती

शहरातील नागरी सुविधांअंतर्गत शहरात, दैनंदिन बाजार इमारती उभारण्यात आलेल्या आहेत. या इमारती बांधून तयार आहेत. मात्र त्यांचे लोकार्पण झालेले नाही. मागे दोन्ही निवडणुकांच्या धामधुमीत त्यांची लोकार्पण रखडली होती. मात्र येणाऱ्या वर्षात या सुविधा इमारतीचे लोकार्पण होऊन नागरिकांना या सुविधांचा लाभ घेता येणार आहे. यात सानपाडा येथील दैनंदिन बाजार इमारतीचा समावेश आहे.

### पनवेल-कर्जत लोहमार्ग

पनवेलपर्यंत असलेली हार्बर लाइन कर्जतपर्यंत नेण्यासाठी अनेक वर्षांपासून सुरू असलेले काम पूर्ण होऊन २०२५ ला पनवेल-कर्जत लोकल सुरू होईल. लोहमार्गाचे काम अंतिम टप्प्यात आले असून मागील अनेक वर्षांपासून हे काम सुरू आहे.





### सायन्स पार्क मार्गी लागणार

नेरूळमधील वंडर पार्कच्या जागेत उभारले जाणारे सायन्स पार्क हा महापालिकेच्या महत्त्वाच्या प्रकल्पांपैकी एक आहे. त्यामुळे, हा प्रकल्प ठरलेल्या वेळेत पूर्ण करण्याचे आव्हान महापालिकेपुढे आहे. या नवीन वर्षात या प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याची डेडलाईन आहे.

### कळंबोली सर्कलवर उड्डाणपुलांचा समूह

कळंबोली सर्कलची वाहतूक कोंडी फोडण्यासाठी पाचशे कोटी रुपये खर्च करून या भागाचा विकास केला जाणार आहे. डिसेंबर २०२४ साली या कामाला सुरुवात झाली आहे. पहिल्या टप्प्यात सुरू असलेल्या कामाला पुढील काही महिन्यात वेग येणार आहे.



